# डोंबिवली नगरपालिका परिषद

नगरपालिका कार्यालय,
लोकमान्य टिळक पथ,
डोंबिवली ता. १६-३-१९७३

जा. क्र. १४८२३० / १६-३-७३

श्रीमती यशोदाबाई ज. देशपांडे
डोंबिवली यांसी,

## बांधकामास मंजुरी

आपला दि. २०-३-७३ चा अर्ज व नकाशाच्या प्रती मिळाल्या व त्यावरून आपणास योजलेले बांधकाम करण्यास पुढील शर्तीवर मंजुरी देण्यात येत आहे.

### बांधकामाचे वर्णन

बिल्डींग रजिस्टर नंबर

१) डॉट कलेक्टर साहेबांकडून नॉन् ॲग्रिकल्चर करून घेतला असला पाहिजे. त्यांत बांधकाम करणेची तिकडून परवानगी आणलेली असली पाहिजे.

२) काम पुरे होताच नगरपालिका ऑफिसमध्ये लेखी कळविले पाहिजे व ते मंजूर झाल्याशिवाय त्याचा वापर करतां कामा नये.

३) प्रत्येक घरमालकाने ॲक्वाप्रिव्ही किंवा सेप्टिक टँक अशा ज्या पद्धतीचे संडास बांधावयाचे असतील त्या पद्धतीच्या नगरपालिकेच्या नियमास अनुसरून बांधले पाहिजे.

४) ही मंजुरी पोचल्याचे तारखेपासून एक वर्षाचे आंत हे बांधकाम सुरू न केल्यास ही मंजुरी रद्द होईल. व पुन्हां जरूर असल्यास नवीन मंजुरी घ्यावी लागेल.

५) हे बांधकाम पूर्ण होतांच बांधकाम पूर्ण झाल्याचे इंजिनिअर / आर्किटेक्ट यांचे कंप्लीशन सर्टिफिकेट घेऊन कर आकारणीचा तक्ता पाठविला पाहिजे. इकडील मंजुरीनंतरच इमारतीचा वापर करतां येईल.

६) कोणचेही बांधकाम करणेपूर्वी मार्जीन जागा सोडणेबद्दल नगरपालिकेची खात्री करून देऊन नंतर कामास सुरवात करावी.

७) मंजूर क्षेत्रापेक्षां जास्त काम केल्यास त्याची सर्व जबाबदारी मालकावर व काम करणाऱ्या कॉन्ट्रॅक्टरवर अगर इंजिनिअरवर राहील.

८) ड्रेन ऑफिसमधून घेऊन जावे.

९) घर बांधतांना घराची सर्व मैलरोडकडे केले जाईल व संडास मेनरोडकडे न येतील एवढे लक्ष द्यावे.

चीफ ऑफिसर
डोंबिवली नगरपालिका परिषद

DOMBIVLI MUNICIPAL COUNCIL

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण
कार्यालय क्र. २
KALYAN-2

| | |
|---|---|
| क.ल. | |
| दस्त क्र. ९२५९९ | २०२ |
| ९५२ | ९६६ |